
मोगली
सौ. मीना सरलष्कर
एम. ए. बीएड.
परी प्रकाशन

मोगली

◆ ——————

© सुरक्षित

◆ ——————

**प्रकाशक :**
**परी प्रकाशन**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.

◆ ——————

**प्रमुख वितरक**
**अजब डिस्ट्रिब्युटर्स**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.

**मुखपृष्ठ :**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

◆ ——————

**मुद्रक :**
जयंत प्रिंटरी

◆ ——————

**आवृत्ती :**
२९ ऑगस्ट, २०१३

◆ ——————

**किंमत :**
रुपये १३०/-

## अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| १. | ये बाळ... तू आमचाच आहेस ! | ३ |
| २. | मोगली - सुंदर फूल | ९ |
| ३. | सर्व शिक्षा अभियान ... | १७ |
| ४. | गड आला पण वीर गेला | २१ |
| ५. | छडी लागे छम-छम... | २७ |
| ६. | नटखट ‘लाल पांडा’ | ३२ |
| ७. | शक्तीपेक्षा युक्ती श्रेष्ठ | ४० |
| ८. | लीलाची समजूत व मोगलीशी... | ४७ |
| ९. | भावासाठी जीव कुर्बान करीन | ५२ |
| १०. | स्वावलंबन | ५८ |
| ११. | माकडांची टोळी | ६२ |
| १२. | माकड टोळीशी युद्ध | ६९ |
| १३. | आपण एकाच वंशाचे आहोत | ७६ |
| १४. | तुला मनुष्यप्राणी बघायचा... | ८२ |
| १५. | मनुष्यप्राणी | ८७ |
| १६. | मी जाऊ तरी कुठे ? | ९४ |
| १७. | मोगली एकटाच भटकत राहतो | ९९ |
| १८. | मोगली आणि दयाळू बाबा | १०२ |
| १९. | दुष्काळाची छाया | १११ |
| २०. | सुंदर शांत जंगल | ११६ |
| २१. | भीती... भीती... भीती | ११९ |
| २२. | मोगलीवर चोरीचा आळ | १२४ |
| २३. | मोगली व जाई | १३० |
| २४. | मोगली आणि माणसांच्या... | १३५ |
| २५. | शेरखानाचा वध | १४१ |
| २६. | मोगली जंगलात परत जातो | १४४ |
| २७. | बलदेवचे कटकारस्थान | १४८ |
| २८. | जाईची सुटका | १५२ |
| २९. | बलदेव शिकाऱ्याची फटफजिती | १५७ |
| ३०. | दुष्टांचा नायनाट | १६२ |
| ३१. | जंगली कुत्र्यांचा सामना | १६६ |
| ३२. | नव्या सरपंचाची निवड | १७१ |
| ३३. | मोगली व जाईची पुनर्भेट | १७५ |
| ३४. | मोगलीला निरोप | १८१ |



# ये बाळ... तू आमचाच आहेस !

पृथ्वीतलावर एक दुर्गम जंगल होते. अबब...! काय त्याचा आकार, विस्तार! त्यात उंच पहाड-डोंगर होते. नजर पोहोचणार नाही एवढ्या खोल दऱ्या होत्या. खळखळत प्रचंड वेगाने वाहणाऱ्या नद्या होत्या. तळ सापडणार नाहीत एवढी खोल तलाव-तळी होती. सूर्यप्रकाश पोहोचणार नाही अशी किर्र व दाट वनराजी, वृक्षवेली होत्या. एकेक वृक्ष तर शंभर फुटापेक्षा उंच फोफावलेले होते. अहो गवत तर माणसांच्या उंचीएवढे वाढलेले असायचे. साहजिकच जंगली श्वापदांचा मुक्त संचार तिथे असायचा. वाघ, सिंह, अस्वल, लांडगे, रानडुक्कर, कोल्हे, तरस, बिबट्या, जंगली कुत्री अशा हिंस्त्र व शिकारी मांसाहारी प्राण्यांची वहिवाट असायची. तर महाकाय हत्ती, धष्टपुष्ट गवा रेडे, गेंडे, हिप्पो यांचे कळप मुक्तपणे चरत हिंडायचे. त्यांना नदीत, तलावात डुंबायला फार आवडायचे. एकमेकांवर पाणी उडवत ते पाण्यात मदमस्त खेळत बसायचे. हरीण, चिंकारा, काळवीट, रानकोंबडे, ससे अशी देखणी जनावरे बागडत असत. एका मोठ्या नदीत अनाकोंडासारख्या अवाढव्य जलसर्पाने एका मोठ्या सिंहाला मारून गिळंकृत केले तर एक मोठी मगर काही मिनिटातच मारून गिळलेली आम्ही स्वत:च्या डोळ्यांनी पाहिले असे जुनेजाणते वृद्ध प्राणी लहान पिलांना सांगायचे व ती पिल्लेही आश्चर्याने अशा अद्‌भुत गोष्टी तल्लीन होऊन ऐकायची. पक्ष्यांचे थवे आकाशातून विहार करायचे. गरुड, बहिरी ससाणा, गिधाडे, घुबडे तर भक्ष्यासाठीच टपलेली असायची.

या जंगलाचे स्वत:चे असे निसर्ग नियम होते. हद्दी ठरलेल्या होत्या. भुकेशिवाय अनाठायी, हत्या, शिकार करायची नाही असा नियम सर्व हिंस्त्र प्राणी कसोशीने पाळायचे. अलीकडे मात्र शेरखानाने धरबंद सोडला होता. तो नियम झुगारून वाटेल तसा वागत होता. सर्व प्राण्यांत त्याने दहशत माजवली होती. एक मात्र खरे, या जंगलात मनुष्यवस्ती नव्हती. त्यामुळे सर्व प्राण्यांत याबाबतीत कुतूहल होते. कारण थोड्याच प्राण्यांनी मनुष्यप्राणी जवळून पाहिला होता.

शांत संथ जंगलात एके दिवशी मात्र मोठी खळबळ उडाली.

''मला मनुष्यप्राण्याचा वास लांबवरून येतोय.'' पट्टेरी शेरखानाने गर्जना केली. तो तबाखी कोल्ह्याला उद्देशून म्हणाला, ''तबाखी, तू खूप धूर्त आहेस. जंगलातील सर्व भागात कानोसा घे. त्या मनुष्यप्राण्याला शोधून काढा आणि मला ताबडतोब कळवा. मी पण त्याला शोधायला जातो. त्या मनुष्य प्राण्याला अजिबात सोडायचे नाही. आपली शिकार आहे ती.''

तबाखी कोल्ह्याने जीभ चाटली. शेरखानाच्या आदेशाप्रमाणे तबाखी कोल्हा मनुष्य प्राण्याच्या वासावर निघाला. दबलेल्या पावलांनी त्याची दिडकी चाल चालू होती. त्याची गाठ अचानक गोविंदा लांडग्याशी पडली. गोविंदा लांडगा शूर व हुशार होता. तो तबाखी कोल्ह्याला चांगलाच ओळखून होता. तबाखी कोल्हा लबाड, धूर्त म्हणून प्रसिद्ध होता. इतरांच्यात भांडणे लावून स्वत:ची पोळी भाजून घेण्यात तो तरबेज होता. खोटेनाटे सांगून चुगली करण्यात तर त्याचा हातखंडा होता. त्यामुळे जंगलातील सज्जन प्राणी त्याच्यापासून दोन हात लांबच राहायचे.

लोचट तबाखी कोल्हा म्हणाला, ''गोविंदा, तुमच्या हिताचेच सांगायला आलोय. मी असं ऐकलंय की शेरखानाने शिकारीची हद्द बदलली आहे. आता तो तुमच्या जवळच्या प्रदेशात घुसलाय ! आणि हो, शेरखान माणसांच्या वासावर फिरतो आहे. हे आले का तुमच्या कानावर ! बघ बुवा, माझे काय मी निघालो.''

गोविंदा म्हणाला, ''काय सांगतोस काय हे ? अरे, हे तर जंगलाच्या नियमांच्या एकदम विरुद्ध आहे. शेरखान असे करू लागला तर जंगल व आपल्या सगळ्यांवर मोठे संकट येईल; पण छे, हे शेरखानाला कोणी सांगायचे ?''



धूर्त तबाखी कोल्हा म्हणाला, ''तेच तर सांगतोय तुला; पण आमच्यावर तुमचा विश्वास नाही. बरे मी चलतो. रामराम !''

असे म्हणतात की मनुष्यप्राण्यांचे एक जोडपे आपल्या छोट्या बालकासह त्या जंगलात आले होते. ते संशोधक असावेत. ते झाडाझुडपांचा, प्राण्यांचा अभ्यास करण्यासाठी तिथे आले असावेत. आपल्या छोट्या बालकाला तंबूमध्ये सोपवून काही वेळ ते बाहेर पडले. तेवढ्यात लांडग्यांचे दोन बच्चे त्या तंबूमध्ये घुसले. एक सुंदर

छोटे बालक मस्तपैकी झोपलेले त्यांनी पाहिले. त्यांना काही समजेना. हा छोटा प्राणी कोण आहे तो ! कारण त्यांनी मनुष्यप्राणी आतापर्यंत पाहिलाच नव्हता. त्या दोन बच्चात कुजबूज सुरू झाली. ''हा आपल्यासारखा का नाही ?'' त्यांनी त्या बालकाचा वासही घेऊन बघितला. त्यांच्या आवाजाने ते बालक उठले. किलकिले डोळे करून त्याने त्या दोन बच्च्यांकडे पाहिले. 'अरे वा ! आपल्याला खेळायला छोटे मित्र मिळाले' असे समजून ते बालक लांडग्यांच्या बच्च्यांमागे जाऊ लागले. ते पाहून त्या लांडग्यांच्या बच्च्यांनी धूम ठोकली. ते बालक धडपडत ठेचकाळत त्यांना गाठण्याचा प्रयत्न करू लागले.

मनुष्यप्राण्याचे जोडपे काही वेळानंतर तंबूत परतले. पाहतात तर काय, त्यांचे छोटे बालक तंबूत दिसत नव्हते. त्यांनी इकडे तिकडे बघितले; पण ते बालक काही सापडेना. आईच्या मनात तर धस्स झाले. ''आपल्या मुलाला कोणत्या वन्य प्राण्याने पळवले तर नाही ना ? त्याचे काही बरेवाईट तर झाले नसेल ना ? त्याला आता भूक लागली असेल. बिचारे काय करत असेल ? छे ! आपण त्याला तंबूत झोपवून बाहेर पडायला नको होते; पण आपण जवळ तर गेलो होतो. आईऽ गं... माझा बाळ कुठे असेल हो ?''

त्यांनी शोधाशोध सुरू केली. जिवाच्या आकांताने ते हाक मारीत होते. ''मोगली... मोगली. तू कुठे आहेस बाळा... मोगली... मोगली !'' तहान भूक विसरून त्यांनी शोधाशोध चालू ठेवली; पण त्यांना तरी जंगलाची काय माहिती होती ? आता रात्र पडू लागली होती. घनदाट जंगलात तेही मार्ग हरवून बसले. प्राण्यांचे डोळे चकाकताना व ते प्राणी गायब होताना त्यांनी पाहिले. त्यांच्या विजेरीमुळे ते प्राणी बहुधा पळून जात असावेत. तरीही त्या जोडप्याने 'मोगली... मोगली' असा पुकारा चालूच ठेवला होता. वाघाच्या डरकाळ्या त्या जोडप्याने ऐकल्या. तो बहुधा त्यांचा मागोवा घेत असावा. ते जोडपे भयभीत झाले. रात्रीच्या अंधारात जंगलातील कड्यांचा अंदाज न आल्याने ते उंच कड्यावरून खोल दरीत, नदीनाल्यात कोसळले. त्यांचा मृत्यू झाला असण्याची शक्यता होती.

अऽरेऽरे ! ते छोटे बालक अनाथ झाले. ते कोठे गेले असावे ? पण म्हणतात ना, 'देव तारी त्याला कोण मारी.' भालू अस्वलाला ते बालक दिसले.

''अरे, हे छोटे बालक मनुष्यप्राण्याचे दिसते आहे ! आणि हे काय ते न भिता माझ्याकडेच टक लावून बघते आहे. त्याचे आई-बाबा कुठे दिसत नाहीत. अऽरे ऽरे. ते मऽम म्हणून काय सांगण्याचा प्रयत्न करीत आहे.'' भालू स्वत:शीच पुटपुटला. एवढ्यात ते बालक पुढे आले. भालू अस्वल प्रेमळ होते. त्याने त्या बालकाला जवळ घेतले, पाणी पाजले. ते बालक दमलेले असावे. क्षणात ते भालू अस्वलाच्या कुशीत झोपी गेले. आता काय करावे या विचारात असताना भालू अस्वलाला डुलकी लागली. भालूला जाग आली त्यावेळी बालक त्याच्याजवळ नव्हते. इकडेतिकडे पाहिल्यावर त्याला ते बालक गोविंद लांडग्याच्या घराकडे चाललेले दिसले.

''हुश्श, सुटलो बुवा. बरे झाले एका चांगल्या बालबच्च्यांच्या घरात जाते आहे ते. तिथे त्याची छान काळजी घेतील.'' भालू स्वत:शीच म्हणाला.

गोविंद लांडगोबा आपल्या परिवारात छान गप्पागोष्टी करत बसले होते. राधा लांडगीणबाई आपल्या दोन पिलांच्या बाळ लीला बघण्यात मग्न झाल्या होत्या. त्या दोघांना कुठे ठेवू कुठे नको असे त्यांना झाले होते. आपल्या खट्याळ पिलांचे त्या दोघांना खूप कोडकौतुक होते. त्यांचे संगोपन करण्यात त्यांना वेळ पुरायचा नाही; पण तबाखी कोल्ह्याने त्यांच्या डोक्यात शेरखानाची भीती घातली होती. त्यातच शेरखानाची डरकाळी त्यांनी लांबवर ऐकली होती. त्याचाच ते विचार करीत होते. एवढ्यात गोविंद लांडग्याला आजूबाजूच्या झाडीतून खसखस ऐकू आली.

''कोण आहे रे तिकडे ?'' त्याने विचारले. एकदम ते आश्चर्यचकित झाले. मनुष्यप्राण्याचे एक छोटे बालक त्याच्याकडे आपली लहान पावले टाकत येताना दिसले. त्याच्या अंगावर एक छोटी चड्डी दिसत होती. डोके सोडून त्याच्या अंगावर इतर प्राण्यांसारखे केस नव्हते. त्याचे डोळे तेजस्वी होते. त्याला भीती ही माहीतच नसावी, इतक्या सहजपणे ते राधा लांडगिणीजवळ गेले. 'म... म... म' म्हणत त्याने लांडगीणबाईंच्याशी माया माया केली आणि गंमत म्हणजे त्यांच्या दोन पिलांप्रमाणे तेही लांडगिणीचे दूध लुसून लुसून पिऊ लागले.

राधा लांडगीणबाईंचा ऊर एकदम भरून आला. त्या लांडगोबाना म्हणाल्या, ''बघा हो किती छान लेकरू आहे हे ! बहुतेक खूप भुकेलेले दिसतेय. माझ्या लेकरासारखेच माझे दूध पित आहे, पोट भरेपर्यंत पिऊ दे बरं. कसं घट्ट चिकटून बसलंय बघा. आपण त्याला सांभाळायचं बरं का !''

त्या लेकराचे पोट भरल्यावर ते खुदकन हसले. दोन पिलांबरोबर ते खेळू लागले. ही पिल्ले कालच भेटलेली होती आणि ती आईकडे पळून आलेली होती. ती सर्वजण एकमेकांबरोबर दंगामस्ती करू लागली. दमल्यानंतर ती एकमेकांच्या कुशीत गाढ झोपली. जणू जुळी भावंडेच !

इतक्यात शेरखानाची डरकाळी त्यांना ऐकायला मिळाली. दोघेही सावध झाले. राधा लांडगिणीने तीनही बच्च्यांना गुहेत झोपवले. तो व गोविंद लांडगा, दोघेजण गुहेच्या दारात पहारा देत बसले. कारण शेरखान अतिशय क्रूर होता. गुंडगिरी, धाकधपटशा, दादागिरी याबद्दल तो कुप्रसिद्ध होता. जंगलाचे कायदेकानून, नियम यांची तो अजिबात कदर करत नव्हता. मनात येईल तसे वागणे, अरेरावी करणे, जंगलाचे नियम मोडणे याबद्दल त्याचे राजेपद काढून घेण्यात आले होते; पण तो स्वत:ला अजून जंगलाचा राजा समजत होता. कोल्हा व माकड हे त्याचे साथीदार होते. तेही इतर प्राण्यांना विनाकारण त्रास देत असत.

शेरखान हुंगत तिथे आला. तो ओरडून म्हणाला, ''ते मनुष्यप्राण्याचे कार्टे कुठे आहे ? मला त्याचा वास येतोय. तुम्ही त्याला कुठे लपवून ठेवले आहे ? त्याचे आईवडील माझ्या नुसत्या

भीतीने पळून गेले आहेत. बहुतेक ते मेले असणार. मुकाट्याने त्या कार्ट्याला माझ्या स्वाधीन करा. ती माझी शिकार आहे.''

गोविंद लांडगा म्हणाला, ''खबरदार ! इथे आमच्या हद्दीत येण्याची तुझी हिम्मतच कशी झाली ? जंगलाचे नियम तुला माहीत नाहीत होय ? लक्षात ठेव, आमच्या लांडग्यांचे स्वतंत्र सार्वभौमिक राज्य आहे. इथे तुला लुडबूड करण्याचे कारण नाही. शिवाय त्या बालकाची काळजी घ्यायची का काय करायचे ते ठरविण्यास आम्ही समर्थ आहोत. तुला ते माणसाचे बालक कदापिही देणार नाही. आता जास्त वटवट न करता आल्या पावली गपगुमान परत जा.''

आधीच चिडका असलेला शेरखान जास्तच चिडून म्हणाला, ''मला शेरखान म्हणतात हे तू विसरलास वाटते. माझ्याशी वाद घालायची तुझी हिम्मतच कशी होते ? याचे परिणाम काय होतील माहीत आहे की नाही ! मी तुझी शिकार करायला देखील मागेपुढे पाहणार नाही. समजलं का रे दीडदमडीच्या लांडग्या !''

आतापर्यंत शांत बसलेली राधा लांडगीण शेरखानाची ही धमकी ऐकून भडकून म्हणाली, ''म्हणे शेरखान... अरे लंगड्या ! नीट कान देऊन ऐक ते माणसाचे बालक आता माझेच लेकरू आहे. ते आमच्या कुटुंबाचा एक भाग आहे. आमचे प्राण पणाला लावून आम्ही त्याचे रक्षण करू. खबरदार एक पाऊल पुढे टाकलंस तर तुझी दुसरी टांगपण तोडून टाकीन. मग तुला समजेल दीडदमडीचे कोण आहे ते !''

राधा लांडगिणीचा त्वेष व संताप बघून शेरखान मनातून हादरलाच. कारण त्याला माहीत होते की पिल्लाला दुसऱ्या कुणी जराजरी हात लावला तर पिल्लाची आई बेभानपणे, बिनदिक्कत हल्ला करून पिल्लांचे रक्षण करते. अशावेळी तिथे कुणाचेही काही चालत नाही. मग गोविंदा व राधा म्हटल्यावर आपली दुसरी टांगही जायबंदी करायला मागेपुढे पाहणार नाहीत. तेव्हा आता माघार घेण्यात शहाणपणा आहे; परंतु सरळ बोलला तर तो शेरखान कसला! स्वत:ची ऐट मारत शेरखान म्हणाला,



''मी बाईबापयांवर हात टाकत नाही. त्यामुळे यावेळी तुम्हाला सोडून देतो; पण हे समजू नका मी तुम्हाला घाबरलोय किंवा माफ केलंय. मला पण जंगलचे नियम माहीत आहेत म्हणून लांडगे पंचायतीच्या सभेत त्या माणसाच्या कार्ट्यावर मी हक्क मागणार आहे. त्यांनी माझे ऐकायलाच पाहिजे. लक्षात ठेवा काही झाले तरी ते माणसाचं कार्टं तुमच्याकडून घेऊनच जाईन. ती माझीच शिकार आहे. समजलात !'' शेरखान बडबडत तिथून निघून गेला.

शेरखान तिथून निघून गेल्यानंतर गोविंद व राधा गुहेत परतले. ते चिंताक्रांत होते कारण शेरखानने दिलेली धमकी पोकळ नव्हती हे ते जाणून होते. तात्पुरती जरी माघार घेतली असली तरी शेरखान लटपटी लढवणार व धूर्त तबाखी कोल्हा त्याला सल्ला देणार याची त्यांना खात्री होती. शिवाय शेरखानाचे इरादे कधी सरळ नव्हते. तो वृत्तीने वाईटच होता आणि दुसऱ्याला त्रास देण्यात त्याला आसुरी आनंद व्हायचा.

गोविंद लांडगा म्हणाला, ''या मानव बालकाला आपल्याजवळ ठेवायचे. त्याचं पालनपोषण करायचं म्हणजे लांडगा पंचायतीची मंजुरी घ्यावी लागेल. त्यासाठी या छोट्या बालकाला पंचायतीसमोर हजर करावे लागेल. तिथे पंच मंडळींची खात्री पटली तरच आपल्याला या बालकाला आपल्याकडे ठेवून घेता येईल. काय करावे ते सुचत नाही.''

राधा लांडगीण म्हणाली, ''अहो, काही काळजी करू नका. सरपंच व पंचमंडळींना माहीत आहे की आपण चांगल्या मार्गाने जाणारे आहोत. आपण कधी कुणाचे वाईट केले आहे काय ? उलट आपण सर्वांनाच मदत करत असतो. सरपंच अकेलानाथ विवेकी आहेत. त्यांना आईच्या मायेची कल्पना आहे. ते बच्च्याला आईपासून कसे हिरावतील. मला खात्री आहे की, पंचायत आपल्यालाच मंजुरी देणार.''

एवढ्यात ते बालक व दोन पिल्ले राधा लांडगिणीला येऊन चिकटली. ते बालक आईच्या चेहऱ्यावरून मायेने हात फिरवित होते. त्याला जणू सांगायचे होते, 'माझे आईबाबा तर मला सोडून गेले. तू तरी मला सोडू नकोस.'

राधाला ते मनोमनी समजले. ती म्हणाली, ''नाही रे राजा, तुला कुठे सोडणार नाही. तू तर माझ्या हऱ्या व ताऱ्या या दोन पिल्लांपेक्षा जास्त प्यारा आहेस. माझ्या काळजाचा तुकडा आहेस. तुला प्रेमाने वाढवीन, काळजी घेईन. शिक्षण देईन. एक दिवस तू या जंगलाचा राजा होशील. दुष्ट लोकांचा नाश करशील. अरे, तू जंगलदेवीचा पुत्र आहेस. ये... बाळ... तू आमचाच आहेस !''

✦✦



# मोगली - सुंदर फूल

महिन्याच्या दर पौर्णिमेला चंद्र उगवला की लांडगा जातीकुळातील सर्व सदस्यांची बैठक होत असे. तसे म्हटले तर जंगलाच्या रीतीनियमानुसार 'लांडगा–समूह' स्वतंत्र गट समजला जात असे. त्यांचे स्वत:चे कायदे–कानून होते. या गट–समूहाचा सरपंच व मंत्रिमंडळ असायचे. एका टेकडीच्या व्यासपीठावर सरपंच अकेलानाथ बसायचे. व्यासपीठाच्या खाली सर्व सदस्य परिवार व कौटुंबिक मंडळी बसायची. महिन्याभरात काही घडामोडी झाल्या असल्या तर त्यांची माहिती द्यायचे ! प्रत्येक सदस्याला आपले मत मांडण्याचा पूर्ण अधिकार होता. त्यावर चर्चा होऊन सरपंच अकेलानाथ निर्णय द्यायचे. त्यांचा निर्णय मात्र अंतिम असायचा आणि सर्व लांडगे–परिवारावर बंधनकारक असायचा. सरपंच अकेलानाथ जुने–जाणते व अनुभवी होते. ते अतिशय शूर व मोठे शिकारी म्हणून प्रसिद्ध होते. एकदा रानडुकरांच्या मोठ्या टोळीने लांडगे परिवारावर भयंकर मोठा हल्ला चढवला होता. त्यावेळी अकेलानाथांनी प्राणांची पर्वा न करता आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने तो हल्ला परतवून लावला व रानडुकरांच्या टोळीला असा धडा शिकवला की, परत लांडगा परिवारावर हल्ला करण्याची इतर प्राण्यांच्या टोळीची हिम्मत झाली नाही. जंगलाची शांतता व रीतिरिवाज पाळण्यासाठी इतर प्राण्यांची लांडगा सदस्यांबद्दल काही तक्रार असेल तर इतर प्राणी त्या दिवशी अकेलानाथना भेटून आपली तक्रार सांगायचे. अकेलानाथ सर्वांना योग्य त्या सूचना द्यायचे. त्यांचे मार्गदर्शन शिकवण मौलिक असायची. त्यामुळे लांडगे समूहातील प्रत्येक व्यक्ती त्यांच्याकडे आदराने पाहत असे.



लांडगा समूहात एक आणखी विधी त्या दिवशी पाळला जायचा. तो विधी म्हणजे लांडगासमूहात प्रवेश ! त्या विधीनुसार नवीन जन्मलेल्या लांडग्याच्या छोट्या-छोट्या पिल्लांना लांडगा समूहात प्रवेश दिला जायचा. पिल्लांची आई आपल्या पिल्लांना घेऊन तिथे यायची. या सर्व पिल्लांची ओळख व तपासणी पंचकमिटीतील ज्येष्ठ सदस्य करायचे. पंचकमिटीच्या सदस्यांना उभे केले जायचे. मग त्यांच्याभोवती पिल्ले व त्यांच्या आयांचे मोठे रिंगण केले जायचे. ती पिल्ले व आया रिंगणाची फेरी लांडगागीते म्हणत तीनदा पूर्ण करायचे. पिल्ले सर्वांना नमस्कार करायची व शेवटी सरपंच अकेलानाथ लांडगा समूहात प्रवेश दिल्याबद्दल जाहीर करायचे. प्रवेश पूर्ण झाला की हळूहळू त्यांचे शिक्षण सुरू व्हायचे. जंगलातल्या कायद्यांची त्यांना माहिती दिली जायची. शिकार कशी करायची, स्वत:चे रक्षण कसे करायचे याबाबतीत त्यांना शिक्षण दिले जायचे.

प्रवेश घेण्यासाठी आजदेखील बरीच पिल्ले व त्यांचे आई-वडील आले होते. काही बच्चे कावरे-बावरे झाले होते. त्यांची आई त्यांना चुचकारून समजावून सांगत होती. काही बच्च्यांनी तर भोकाडच पसरले होते. राधा लांडगिणीनेही आपल्या हऱ्या-नाऱ्या या दोन बच्च्यांना व तिने पालन-पोषण केलेल्या मनुष्य प्राण्याच्या बालकाला समूह प्रवेशासाठी आणले होते. हे मानवी बालक लांडग्यांच्या बच्च्यांपेक्षा एकदम वेगळे होते. चार पायांवर उभे रहायचे अथवा बसायचे याऐवजी ते दोन पायांवर उभे होते व दोन हातांनी टाळ्या वाजवीत होते. त्या मनुष्य प्राण्याच्या बालकाला पाहून काही लांडग्यांनी नाक मुरडले व आपली नापसंती दर्शवली. लांडगा म्हणजे केसाळ प्राणी. तर या बालकाचे डोके सोडले तर अंगावर केस नव्हते. लांडग्यासारखी त्याला शेपटी नव्हती. त्याने एक छोटी चड्डी घातली होती जी लांडगा व बच्च्यांनी प्रथमच पाहिली होती. मुख्य म्हणजे त्याला भीती ही कसली माहीतच नव्हती. त्याचे डोळे अत्यंत तेजस्वी होते. आपल्या आईचा राधा लांडगिणीचा हात धरून ते हसत होते.

एवढ्यात व्यासपीठाच्या बाजूने एक भयंकर डरकाळी फोडत शेरखान आला. गुरगुरत व धमकी देत तो अकेलानाथांना म्हणाला, ‘‘हे सरदार, या मनुष्याच्या कार्ट्यावर माझा हक्क आहे. ते मुकाट्याने माझ्या स्वाधीन करा ! ती माझी शिकार आहे. तुमच्या लांडग्यांच्या टोळीला या कार्ट्याचा काय उपयोग ? तुम्ही त्याला प्रवेश देणार तोही लांडगा टोळीत ! हा ! हा ! हा ! त्या कार्ट्याचे आई-वडील मला घाबरून पळून गेले होते. ते दरीत पडून मेले असावेत. ते काही नाही. जंगलाच्या नियमाप्रमाणे त्या कार्ट्याला माझ्याकडे द्या ! ती माझी शिकार आहे.’’

सभेत एकदम गोंधळ उडाला. शेरखानचे वागणे होतेच तसले ! लांडग्यांची पिल्ले घाबरली. काही लांडगे कावरे-बावरे झाले. काही सदस्य अकेलांना म्हणाले, ‘‘सरपंच या मनुष्याच्या बालकाला लांडगा समूहात का ठेवायचे ? ते आधी आपल्या पोरांपेक्षा वेगळेच आहे. शिवाय या बालकावरून शेरखानाची दुश्मनी व भांडण आपण कशासाठी ओढवून घ्यायचे ! नसती आफत